सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत.. (२२०४- १७३८)

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र :-राक्रीधो-२०२६/प्र.क्र.११८/ई-१७५७११७/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीदि-२०२३/प्र.क्र.१३२/क्रीयुसे-१, दि. २९ डिसेंबर, २०२३
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०२३/प्र.क्र.२४३/२३/क्रीयुसे-३, दि. २९ डिसेंबर, २०२३
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२४२५/(७०/२५)/अर्थसंकल्प, दि.१७/१०/२०२५
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ९/०४/२०२६
५) सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक युकयो/निधी वितरण/योजना-१७३८/२०२५-२६/का-१०/१८८८, दि.१५.०७.२०२६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन दिनांक २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दिनांक १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये राज्य क्रीडा दिन, राष्ट्रीय क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह साजरा करण्यासाठी सुधारीत अनुदान निश्चित करण्यात आले आहेत.

सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्या संदर्भ क्र. ५ येथील प्रस्तावानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्याकरीता प्रति जिल्हा रु.५०,०००/- (३६ जिल्हे* रु.५०,०००/-) याप्रमाणे रू.१८.०० लक्ष (अक्षरी रूपये अठरा लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन, साजरा करण्याकरीता एकूण रू.१८.०० लक्ष (अक्षरी रूपये अठरा लक्ष फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	सदर खर्च "मागणी क्रमांक: ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०४, (२५) क्रीडा सप्ताह) (२५) (०१) महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा सप्ताह साजरा करणे (कार्यक्रम) ५० इतर खर्च (वेतनेतर) (२२०४ १७३८) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचा निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावा व खर्च झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास सादर करणे आवश्यक राहील तसेच, निधी खर्च करताना सर्व वित्तीय नियम, शासन निर्णय, परिपत्रके व कोषागार नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३.	वित्त विभागाच्या दि.०९.०४.२०२६ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५११/व्यय-५, दिनांक ११.०८.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८३११११४११९३४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALIT SHARMA

Digitally signed by LALIT SHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=DB621A906466D6D122480FEC81754F785664F0E4831D61AF10980A0CF453BED3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=66B04DB68665A3A183AC7ACE7607F621695A02F5FD309828173A72DF54E495E1, cn=LALIT SHARMA
Date: 2026.08.31 11:15:23 +05'30'

(ललित शर्मा)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री, (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव
२. प्रधान सचिव (क्रीडा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
९. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११. अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती, क्रीयुसे-३